# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## ( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र. ०६/२०२६

**विषय :-** कार्यालयीन ओळखपत्राबाबत.

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.जीएडी-३२०३६/३१/ २०२५-जीएडी (रवका-१.), दि.१०/०९/२०२५.

या परिपत्रकाव्दारे सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.जीएडी-३२०३६/३१/२०२५-जीएडी (रवका-१.), दि.१०/०९/२०२५ अन्वये शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर लावण्याबाबत सूचना निर्गमित केलेले आहेत. तसेच सदर सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुख/विभागप्रमुख यांची राहील, अशा आशयाच्या सूचना सदर परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेले आहेत. सदर शासन परिपत्रकातील आशय स्वयंस्पष्ट असून सोबत प्रत जोडली आहे.

शासनाने सदर विषयाच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार विद्यापीठ संकेतस्थळावर परिपत्रक प्रसिध्द करुन सूचना देण्यात आलेल्या असून कार्यालयीन शिस्त व विद्यापीठ परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने आपणास देण्यात आलेले ओळखपत्र विद्यापीठ कार्यालयात प्रवेश करताना आणि कार्यालयात असताना दर्शनी भागावर लावणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वांनी सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. एएन/163 )
दिनांक : 13 JAN 2026 )

**(प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे)**
**प्रभारी कुलसचिव**

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधीत शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

**शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर लावण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक जीएडी-३२०३६/३१/२०२५-जीएडी (रवका-१.)**

६३१, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई. पिन ४०००३२.

दिनांक : १० सप्टेंबर, २०२५.

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आयएनडी-११७९/४४/अठरा(रवका), दि.०६.०२.१९८०.

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१६/१८(रवका), दि.०७.०५.२०१४ व दि.१०.१०.२०२३.

शासन परिपत्रक.

शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात असताना आपले कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर लावण्याबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१६/१८(रवका), दि.०७.०५.२०१४ द्वारे सूचना देण्यात आल्या होत्या. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१६/१८(रवका), दि.१०.१०.२०२३ द्वारे उक्त सूचनांचा पुनरुच्चार करण्यात आला.

२. असे असताही, काही शासकीय अधिकारी/कर्मचारी हे कार्यालयात असताना आपले कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर लावत नाहीत असे निदर्शनास आले आहे.

३. म्हणून, आता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-

१) राज्यातील सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात प्रवेश करताना आणि कार्यालयात असताना आपले कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर लावावे.

२) कार्यालयात प्रवेश करताना आणि कार्यालयात असताना आपले कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर न लावणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

४. वरील परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांची राहील.

५. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५०९१०१८०५५२२७०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SHAHAJAHAN SHAKUR MULANI
Date: 2025.09.10 18:06:46 +05'30'

**(शहाजहान मुलाणी)**
**शासनाचे उपसचिव.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
५) मा. उप मुख्यमंत्री, नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उप मुख्यमंत्री, वित्त व नियोजन, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
९) सर्व मा.संसद सदस्य/विधानपरिषद सदस्य/विधानसभा सदस्य.
१०) मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व प्रशासनिक विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई *(त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह).*
१२) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१४) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) सर्व पोलीस आयुक्त *(पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, वगळून).*
१८) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
१९) सर्व जिल्हाधिकारी.
२०) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त *(बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून).*
२१) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.
२२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

**प्रत-**

१) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) निवड नस्ती, रवका-१.